# प्रेसनोट

दिनांक ७/०७/२०१८

सिंधुदुर्ग स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून महामार्गावरील मोबाईल चोरी मधील **आरोपीत यांस जेरबंद**

---

मा.श्री.दिक्षीत गेडाम, पोलीस अधीक्षक सो, सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेतील संयुक्तिक पथकाने केलेली धडक कारवाई.

सावंतवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ३८/२०१८ भादवि कलम ३७९ मधील आरोपीत यांस पकडून त्यांचेकडून ४०००/- रुपये किमतीचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल जिमखाना मैदान सावंतवाडी येथून हस्तगत करुन आरोपीत यांस सावंतवाडी पोलीस ठाणे येथे जमा केलेले आहे.

तसेच कणकवली पोलीस ठाणे गुन्हा रजि नं १२५/२०१८ भादवि कलम ३७९ मधील मोबाईल चोरीस गेलेला होता. त्या गुन्हयातील आरोपीत यांस निपाणी, जिल्हा कोल्हापूर येथे पकडण्यात आलेले आहे.

सदर कारवाईत मोबाईल चोरीचे २ गुन्हे उघडकीस आणलेले आहे.